## ॥ द्वादश ज्योतिर्लिङ्ग स्तोत्रम् ॥

बारा ज्योतिर्लिंगाचे माहात्म्य वर्णन करणारे हे स्तोत्र अनेक भाविकांच्या नित्य पठणात आहे. ते आदिशंकराचार्यांनी रचले आहे असे मानले जाते. त्याचे सर्व श्लोक इंद्रवज्रा (गण- त त ज ग ग) / उपेंद्रवज्रा (गण- ज त ज ग ग ) वृत्तात गुंफले आहेत. बहुतेक सर्व ज्योतिर्लिंगांचा उल्लेख शिवपुराण व स्कंदपुराणात येतो.

लिंग या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. त्यातील एक ` ईश्वराची प्रतिमा ' असा आहे. ज्योतिर्लिंग या शब्दातून तेजोमय ईश्वरी रूप असा अर्थ अभिप्रेत आहे.

**सौराष्ट्र-देशे विशदेऽतिरम्ये**
**ज्योतिर्मयं चन्द्रकलावतंसम् ।**
**भक्तिप्रदानाय कृपावतीर्णं**
**तं सोमनाथं शरणं प्रपद्ये ॥ १ ॥**

**मराठी- अत्यंत शांत व रमणीय असलेल्या सौराष्ट्र देशात आपल्या (भक्तांना) भक्तीचे दान करण्यासाठी कृपाळूपणे ज्याने अवतार घेतला आहे, ज्याच्या मस्तकाला चंद्र शोभा देत आहे, अशा सोमनाथाला मी शरण जातो.**

**सौराष्ट्र देशी अतिरम्य ठायी**
**देण्यास भक्ती अवतीर्ण होई ।**
**तेजस्वरूपी रजनीश माथा**
**देई मला आश्रय सोमनाथा ॥ ०१**

**श्रीशैल-शृङ्गे विबुधातिसङ्गे**
**तुलाद्रितुङ्गेऽपि मुदा वसन्तम् ।**
**तमर्जुनं मल्लिक-पूर्वमेकं**
**नमामि संसार-समुद्र-सेतुम् ॥ २ ॥**

**मराठी- अत्यंत उंच पर्वतापेक्षाही उंच अशा श्रीशैल शिखरावर देवांच्या सहवासात राहणा-या आणि भवसागर ओलांडण्यासाठी पूलच असणा-या, नावाच्या अगोदर मल्लिक शब्द असणा-या अर्जुनाला (मल्लिकार्जुनाला) मी नमस्कार करतो.**

अत्युच्च टोकावर पर्वताच्या
श्रीशैल, राहून सवे सुरांच्या ।
जो पूल दर्या-भव लंघण्याते
वंदू तया मल्लिक अर्जुनाते ॥ ०२

अवन्तिकायां विहितावतारं
मुक्तिप्रदानाय च सज्जनानाम् ।
अकालमृत्योः परिरक्षणार्थं
वन्दे महाकाल-महासुरेशम् ॥ ३ ॥

मराठी- ज्याने सज्जनांना अकाली मृत्यूपासून संरक्षण आणि मोक्ष देण्यासाठी म्हणून अवंतीपुरीत अवतार घेतला अशा महाकाल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महादेवाला मी नमस्कार करतो. ॥ ३॥

अवंति ग्रामी अवतार घेई
मुक्ती जनां सज्जन दान देई ।
नमू महाकाल असा पुरारी
राखी अकाली यमदूत दूरी ॥ ०३

कावेरिका-नर्मदयोः पवित्रे
समागमे सज्जन-तारणाय ।
सदैव मान्धातृपुरे वसन्तं
मोङ्कारमीशं शिवमेकमीडे ॥ ४ ॥

मराठी- कावेरी आणि नर्मदेच्या पवित्र संगमाजवळील मांधाता नगरीत नित्य निवास करणा-या, सुजनांचे रक्षण करणा-या त्या ओंकारस्वरूपी कल्याणकारी शंकराची मी स्तुती करतो ॥ ४॥

रेवा नि कावेरि मिलाफ जेथे
पवित्र, मांधातृ-पुरीत तेथे ।
करी सदा राखण सज्जनांची
स्तुती करी ॐ स्वरुपी शिवाची ॥ ०४

पूर्वोत्तरे प्रज्वलिका-निधाने
सदा वसन्तं गिरिजासमेतम्
सुरासुराराधितपादपद्मं
श्रीवैद्यनाथं तमहं नमामि ॥ ५ ॥

मराठी-  जो नेहमीच माता पार्वतीसोबत ईशान्य दिशेला तेजोमय निवासस्थानी राहतो, ज्याच्या चरणकमळांची देव तसेच राक्षस आराधना करतात, त्या श्री वैद्यनाथाला मी नमस्कार करतो.

राही महेश्वर सवे भवानी
दिशेस ईशान्य तेजस्वि स्थानी ।
पदाम्बुजा सेविति देव दैत्य
श्रीवैद्यनाथास प्रणाम नित्य ॥ ०५

टीप- ईशान्य दिशेला धगधगणारे निवासस्थान म्हणजे स्मशान असाही अर्थ काही अभ्यासकांनी घेतलेला दिसतो.

याम्ये सदङ्गे नगरेऽतिरम्ये
विभूषि-ताङ्गं विविधैश्च भोगैः ।
सद्भक्ति-मुक्ति-प्रदमीश-मेकं
श्रीनागनाथं शरणं प्रपद्ये ॥ ६ ॥

मराठी- दक्षिणेकडील अतिशय सुंदर सदंग नगरीत सुंदर अलंकारांनी सजलेल्या आणि विविध उपचारांनी परिपूर्ण असलेल्या, खरी भक्ती आणि मोक्ष देणा-या श्री नागनाथाला मी शरण जातो.

जो दक्षिणे रम्य सदंग ग्रामी
शोभे अलंकार नि भोग नामी ।
जो मोक्ष भक्तीतुन दे जनांना
श्री नागनाथा, धरितो पदांना ॥ ०६

महाद्रिपार्श्वे च तटे रमन्तं
सम्पूज्यमानं सततं मुनीन्द्रैः ।
सुरासुरैर्यक्षमहोरगाद्यैः
केदार-मीशं शिवमेक-मीडे ॥ ७ ॥

मराठी- जो महान पर्वताच्या सन्निध कड्यावर रमतो, ज्याची श्रेष्ठ ऋषी तसेच देव, राक्षस, यक्ष आणि महासर्प देखील पूजा करतात, अशा एकमेव कल्याणकारी केदारनाथाची  मी स्तुती करतो.

रमे कपारी हिमपर्वताच्या
पूजा जिथे नित्य सुरू ऋषींच्या ।
सर्पा-सुरा-यक्ष नि दानवांच्या
केदार, ओळी मम या स्तुतीच्या ॥ ०७

सह्याद्रिशीर्षे विमले वसन्तं
गोदावरीतीरपवित्रदेशे ।
यद्दर्शनात्पातकमाशु नाशं
प्रयाति तं त्र्यम्बकमीशमीडे ॥ ८ ॥

मराठी- गोदावरी तीरावरील पवित्र प्रदेशात सह्यपर्वताच्या स्वच्छ शिखरावर राहणाऱ्या आणि ज्यांच्या दर्शनाने पापांचा तात्काळ नाश होतो अशा श्री त्र्यंबकेश्वराची मी स्तुती करतो.

गोदातटी पावन क्षेत्र देशी
सह्याद्रिशेंड्यावर जो निवासी ।
ज्या दर्शने पाप तत्काळ नाशी
गीत स्तुती अर्पितो त्रंबकासी ॥ ०८

सुताम्रपर्णी-जल-राशियोगे
निबध्य सेतुं विशिखैरसंख्यैः ।
श्रीरामचन्द्रेण समर्पितं तं
रामेश्वराख्यं नियतं नमामि ॥ ९ ॥

मराठी- ताम्रपर्णी (वनस्पती) आणि समुद्राच्या संगमावर असंख्य बाणांनी पूल बांधून श्री रामचंद्राने ज्याची स्थापना केली होती, त्या श्री रामेश्वराला मी नियमितपणे नमस्कार करतो.

जिथे किना-यावरताम्रपर्णी
उभारला पूल असंख्य बाणीं ।        (बाणीं- बाणांनी)
ज्या स्थापियेले रघुनंदनाने
रामेश्वरा मी नमितो मनाने ॥ ०९

यं डाकिनी-शाकिनिका-समाजे
निषेव्यमाणं पिशिताशनैश्च ।
सदैव भीमादि-पद-प्रसिद्धं
तं शङ्करं भक्तहितं नमामि ॥ १० ॥

मराठी- डाकिनी आणि शाकिनींच्या गटातील मांसभक्षकांनी सेवा केलेल्या त्या भक्त-कल्याणकारी भीमशंकराला मी नेहमी नमस्कार करतो.

ज्या सेविले डाकिनि शाकिनींनी
की सेविले मांसभक्षी गटांनी ।
प्रसिद्ध भीमाशिव हीतकारी
भक्तां, तया वंदने नित्य सारी ॥ १०

टीप- डाकिनी आणि शाकिनी या हिंदू आणि बौद्ध तंत्रशास्त्रातील स्त्री-शक्ती, योगिनी किंवा विशिष्ट आध्यात्मिक ऊर्जा मानल्या जातात. डाकिनीला ज्ञानी, आकाशगामी, आणि परिवर्तनकारी (तांत्रिक) ऊर्जा मानले जाते, तर (काही परंपरांमध्ये) शाकिनी मानवी चक्रांशी संबंधित उग्र शक्ती मानली जाते. हे प्रामुख्याने भैरवाच्या उपासनेशी जोडलेले आहे.

सानन्दमानन्दवने वसन्तम्
आनन्दकन्दं हतपापवृन्दम् ।
वाराणसीनाथमनाथनाथं
श्रीविश्वनाथं शरणं प्रपद्ये ॥ ११ ॥

मराठी- जो स्वतः आनंद स्वरूप आहे आणि आनंदवनात (म्हणजेच काशी क्षेत्रात) आनंदाने राहतो, जो सर्व पापांचा नाश करतो, अशा अनाथांचा स्वामी श्री विश्वनाथाचा मी आश्रय घेतो.

आनंद रूपात, निवास काशी
आनंद राशी, बहु पाप नाशी ।
काशी प्रभू तोचि अनाथ स्वामी
त्या विश्वनाथा नत जाहलो मी ॥ ११

**इलापुरे रम्यविशालकेऽस्मिन्**

**समुल्लसन्तं च जगद्वरेण्यम् ।**

**वन्दे महोदारतर-स्वभावं**

**घृष्णेश्वराख्यं शरणं प्रपद्ये ॥ १२ ॥**

**मराठी- इलापूर (वेरूळ) च्या सुंदर विशाल मंदिरात राहणा-या आणि संपूर्ण जग ज्याची पूजा करते आणि ज्याचा स्वभाव खूप उदार आहे, अशा घृष्णेश्वर नावाच्या तेजस्वी भगवान शिवाचा मी आश्रय घेतो.**

**वेरूळच्या भव्य सुरेख स्थानी**

**घृष्णेश राहे अतिश्रेष्ठ दानी ।**

**उपासती सर्व जगी शिवाला**

**मी आसरा घेत तया पदाला ॥ १२**

**ज्योतिर्मयद्वादशलिङ्गकानां**

**शिवात्मनां प्रोक्तमिदं क्रमेण ।**

**स्तोत्रं पठित्वा मनुजोऽतिभक्त्या**

**फलं तदालोक्य निजं भजेच्च ॥ १३ ॥**

**मराठी- जर एखाद्या व्यक्तीने या बारा तेजस्वी शिवलिंगांचे क्रमानुसार सांगितलेले स्तोत्र अत्यंत भक्तीभावाने पठण केले तर त्याला त्यांच्या दर्शनाचे फायदे मिळतील.**

**तेजाळ बारा प्रतिमा शिवाच्या**

**गाईल हे स्तोत्र भक्तीत, त्याच्या ।**

**क्रमाक्रमाने, फलद्रूप होई**

**की दर्शने भक्त प्रत्यक्ष घेई ॥ १३**

। इति श्रीद्वादशज्योतिर्लिङ्गस्तोत्रं सम्पूर्णम् ।

## लघु स्तोत्रम्

अनेक भाविकांच्या दैनंदिन पठणात असलेले हे स्तोत्र अनुष्टुभ छंदात रचले असून पहिल्या चार श्लोकात बारा ज्योतिर्लिंगांची भौगोलिक स्थाने सांगितली आहेत. ही स्थाने खालीलप्रमाणे -

१. (सोरठी) सोमनाथ- सौराष्ट्र, प्रभास पाटण, वेरावळ, गुजरात

२. मल्लिकार्जुन- श्रीशैल (क्रौंच) पर्वत, कृष्णा नदी तीरी, आंध्र प्रदेश.

३. महाकाल- उज्जैन, मध्यप्रदेश

४. ओंकारेश्वर/अमलेश्वर- ओंकारेश्वर आणि अमलेश्वर ही दोन वेगवेगळी मंदिरे मध्यप्रदेशातील खंडवा जिल्ह्यात आहेत. ओंकारेश्वर बेट (मांधाता पर्वत) नर्मदा नदीच्या मध्यभागी आहे, तर अमलेश्वर (अमरेश्वर) दक्षिण तीरावर आहे.

५. वैद्यनाथ- परळी वैजनाथ, बीड जिल्हा, महाराष्ट्र. याखेरीज झारखंडमधील देवघर येथेही बाबा बैद्यनाथ धाम असून येथे रावणाने शिवलिंग ठेवल्याची आख्यायिका आहे.

६. भीमशंकर (भीमाशंकर)- पुणे जिल्हा, महाराष्ट्र. भीमा नदीचा उगम येथे असल्याने त्याला भीमाशंकर असे नाव आहे. याखेरीज ओडिशा राज्यातील भीमपूर येथे महेंद्रतनया नदीवर पवित्र महेंद्रगिरी पर्वतरांगाच्या पश्चिम भागात भीमशंकर ज्योतिर्लिंग (डाकिनीयम) नामक हिंदू मंदिर आहे. हे क्षेत्र डाकिनी क्षेत्र मानले जाते.

७. रामेश्वर (रामनाथ)- पंबन बेट, रामनाथपुरम जिल्हा, तामिळनाडू

८. नागेश्वर (नागेश)- द्वारका व बेट द्वारका यांच्या दरम्यान, जिल्हा देवभूमी द्वारका, गुजरात. या प्रदेशाला दारुकवन असेही संबोधले जात असे.

९. विश्वनाथ- गंगातीरी, वाराणसी (काशी), उत्तर प्रदेश.

१०. त्र्यंबकेश्वर- ब्रह्मगिरी पर्वताच्या पायथ्याशी, नाशिक जिल्हा, महाराष्ट्र. गौतमी (दक्षिण गंगा) हे गोदावरी नदीचे पौराणिक नाव असून, ती त्र्यंबकेश्वर येथे उगम पावते.

११. केदारनाथ- मंदाकिनी नदीतीरी, रुद्रप्रयाग जिल्हा, उत्तराखण्ड.

१२. घृष्णेश्वर- दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर जिल्हा, महाराष्ट्र.

**सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम् ।**
**उज्जयिन्यां महाकालं ॐकारममलेश्वरम् ॥**
**परल्यां वैद्यनाथं च डाकिन्यां भीमशंकरम् ।**
**सेतुबंधे तु रामेशं नागेशं दारुकावने ॥**
**वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे ।**
**हिमालये तु केदारं घृष्णेशं तु विशालके ॥**
**एतानि ज्योतिर्लिंगानि सायं प्रातः पठेन्नरः ।**
**सप्त जन्म कृतं पापं स्मरणेन विनश्यति ॥**

मराठी- ही ज्योतिर्लिंगांची नावे जो मनुष्य सकाळ संध्याकाळ पठण करील, त्याचे सात जन्मात केलेले पातक नष्ट होईल.

***************

धनंजय बोरकर (९८३३०७७०९१)

www.stotramanjusha.com

अशा एकूण ६० संस्कृत स्तोत्रांचे गद्य व पद्य अनुवाद माझ्या ‘ स्तोत्र मंजूषा ’ या पुस्तकात समाविष्ट आहेत. या क्षेत्रात रस असणा-यांनी अवश्य संपर्क साधावा.